डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ८७ /२०२६ दि. १४/०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १९/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:३० वाजता डोंबिवली पुर्व शहरात श्री गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली पुर्व यांचे वतीने स्वागतयात्रा भागशाळा मैदान, डोबिंवली पश्चिम येथुन सुरू होवुन कोपर ब्रिज मार्गे शिवमंदीर रोड–चार रस्ता–बाजीप्रभु चौक–फडके रोड, डोबिंवली पुर्व येथे येणार आहे. सदरवेळी बाजी प्रभु चौक,फडके रोड, मदन ठाकरे चौक, गणपती मंदीर, आप्पादातार चौक येथे गुढीपाडवा सणानिमित्त नववर्ष स्वागतयात्रे करिता महीला, नागरीक, युवक, युवती मोठया संख्येने उपस्थीत राहुन गुढीपाडवा सण साजरा करतात. सदर स्वागतयात्रेत लेझीम पथक, सनई चौघडा, भजन, दिंड्या, अनेक चित्ररथ तसेच सर्व प्रांतीय परिवार, संप्रदाय, समाज मंडळे समाविष्ठ होणार आहेत. सदर स्वागतयात्रेमुळे लो. टिळक चौक, गणपती मंदिर रोड, छेडा रोड, फडके रोड, मदन ठाकरे चौक, बाजीप्रभु चौक, मॉडर्न कॅफे, चिंतामणी ज्वेलर्स समोरील रोड, आगरकर रोड, आय. डी. बी. आय बॅके समोरील रोड या भागात वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या फडके रोडवरील बाजीप्रभु चौक ते आप्पा दातार चौक पर्यंत येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांकरीता **संपुर्ण फडके रोड, एम.एस.ई.बी. कार्यालय, वृंदावन हॉटेल व अंबिका हॉटेल, मदन ठाकरे चौकास दुतर्फा, बाबासाहेब जोशी पथ कॉस रोड, सावरकर रोड कॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने ठाकुर्ली स.वा. जोशी हायस्कुल समोरील रोडने नेहरू रोड मार्गे डोंबिवली स्टेशन कडे तसेच फडके रोडकडे येणारी वाहने ही लो. टिळक रोडने, सावरकर रोडने स्व. इंदीरा चौक मार्गे व डोंबिवली स्टेशन परिसरात इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने लो. टिळक चौक कडे येणाऱ्या खाजगी बसेस व अवजड वाहनांकरीता **छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर खाजगी बसेस व अवजड वाहने घरडा सर्कल येथे यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** नेहरू रोडने गणेश मंदिर रोड येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणेश मंदिर गेट, नेहरू कॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने नेहरू रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** छेडा रोडने गणेश मंदिराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तुलसी स्वीट कॉर्नर, छेडा कॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने गणेश मंदिर रोडने आपटे रोड, शिवाजी पथ, डॉ. मुखर्जी पथ या मार्गाने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**५)** पी. पी. चेंबर्स कडुन फतेह अलि रोडने फडके रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पी. पी. चेंबर्स** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने चिपळुणकर रोडने पुढे केळकर रोड – स्वामी विवेकानंद रोड – राथ रोडमार्गे नेहरू रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**६)** स्वागतयात्रा नाना शंकरशेठ रोड येथुन पुढे जात असताना नाना शंकर शेठ रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने घ. गुप्ते कॉस रोड, म. गांधी रोड, रेतीबंदर रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**७)** स्वागतयात्रा दिनदयाळ रोडने म.गांधी रोडचे दिशेने जात असताना रेतीबंदर रोडकडुन सम्राट अशोक चौकमार्गे दिनदयाळ चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट अशोक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने घनश्याम गुप्ते कॉस रोड, रेतीबंदर रोडने, ठाकुरवाडी मुंब्रा देवी रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद –	८) म. गांधी रोडने प. दिनदयाळ रोडमार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **प. दिनदयाळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने म. गांधी रोडने घनश्याम गुप्ते रोड, म. फुले रोड, सुभाष रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	९) स्वागतयात्रा कोपर ब्रिज येथे आल्यांनतर डोबिंवली पश्चिमेकडुन कोपर ब्रिजवरून डोबिंवली पुर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोपर ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने म. फुले रोडने बावन चाळ नवीन ठाकुर्ली ब्रिजवरून डावीकडे वळण घेवुन व्ही. पी. रोडने इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	१०) छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने टिळक चौकमार्ग येणारी के.डी.एम.टी व एन एन एम टी चे बसेस करिता लो. **टिळक रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व के.डी.एम.टी व एन एन एम टी बसेस आर पी रोड मार्गे चार रस्ता पाटणकर चौक येथुन डावे वळण घेवुन मानपाडा रोडन इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	सदर कालावधीत फडके रोड वरील बाजी प्रभु चौक ते आणा दातार चौक दरम्यानचा रस्ता **नो पार्किंग** करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि.१९/०३/२०२६ रोजी सकाळी ०४:०० ते दुपारी १३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनाना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.